सकाळ

दि. १९ मे २०११

# स्वयंसेवी संस्थांनी परस्परांना सहकार्य करावे

## उमा प्रभू यांचे आवाहन; मळगाव येथे प्रशिक्षण शिबिर व क्षमता वृद्धी कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कुडाळ, ता. १८ : स्वयंसेवी संस्था ग्रामीण भागात तळागाळात काम करत असताना असंख्य अडचणी येत असतात. अशा वेळी परस्पर सहकार्याच्या भावनेतून काम केल्यास त्यांची प्रगती निश्चित होईल, असा विश्वास जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या अध्यक्ष तथा राष्ट्रीय साक्षरता अभियान कार्यकारिणी सदस्य सौ. उमा सुरेश प्रभू यांनी व्यक्त केला.

मळगाव येथील हॉटेल कोकण क्राऊन येथे नुकत्याच आयोजित स्वयंसेवी संस्थांच्या एकदिवसीय क्षमता वृद्धी कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून सौ. प्रभू बोलत होत्या. सौ. प्रभू यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. या वेळी राष्ट्रीय साक्षरता अभियानचे सल्लागार आर. पी. पाठक, नाबार्डचे जनरल मॅनेजर एल. के. पिंगळे, जनशिक्षण संस्थानचे संचालक आर. व्ही. कदम उपस्थित होते.

सौ. प्रभू म्हणाल्या, "जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन अनेकांनी आपले स्वयंरोजगार सुरू केले आहेत, ही समाधानाची बाब आहे."

याप्रसंगी नाबार्डचे महाप्रबंधक एल. के. पिंगळे म्हणाले, "प्रशिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आपल्या सभोवताली घडणाऱ्या नवीन घटना आपणास समजल्या पाहिजेत आणि त्याचा उपयोग आपले काम करीत असताना झाला पाहिजे."

या वेळी उपस्थित तज्ज्ञ व्याख्याते सौ. शैला अमृते, सौ. परिणिता कानेटकर, रघुवीर देसाई, आनंद देसाई, सौ. कांचन परुळेकर, डॉ. अभय कुदळे, डॉ. पुरुषोत्तम आगाशे यांची अनुक्रमे संपर्क यंत्रणा, साधनांची उपलब्धता, उत्पादित वस्तूची गुणवत्ता व दर्जा, वेष्टन व विपणन कौशल्य, स्वयंसिद्धा संस्थेची यशोगाथा, सवांद कौशल्य, दस्तऐवज ठेवणे आदी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी जनशिक्षण संस्थानच्या प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या विविध खाद्यपदार्थ, शोभिवंत वस्तू, हस्तकलेच्या वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील अनेक स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. लुपिन फाऊंडेशनचे व्यवस्थापक योगेश प्रभू यांनी आभार मानले.

लोकसत्ता
दि. २ मे. २०११

# आर्थिक सबलीकरणात जनशिक्षण संस्थानचा मोठा वाटा - उमा प्रभू

**सावंतवाडी, १ मे/ वार्ताहर**

स्वतःच्या पायावर उभे राहून आर्थिक सबलता साधण्यासाठी जनशिक्षण संस्थानने सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात गेल्या दहा वर्षांत सुमारे पन्नास हजार लोकांना प्रशिक्षित केले आहे. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाची क्रांती घडविण्याची ताकद प्रशिक्षणार्थीकडे नक्कीच येईल, असा विश्वास जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गच्या अध्यक्षा उमा सुरेश प्रभू यांनी व्यक्त केला. जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्ग व लुपीन ह्युमन वेल्फेअर ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंसेवी संस्थांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळेत उमा प्रभू मळगाव येथे बोलत होत्या. या वेळी नाबार्डचे महाव्यवस्थापक एल. के. पिंगळे, एनआरएचएमचे आर. पी. पाठक व संचालक आर. व्ही. कदम उपस्थित होते. माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार सुरेश प्रभू यांनी मानव साधन विकास संस्था संचालित व मनुष्यबळ विकास मंत्रालय पुरस्कृत जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्गची १० वर्षांपूर्वी स्थापना केली, असे सांगून उमा प्रभू म्हणाल्या, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये विविध व्यावसायिक प्रशिक्षण व स्वयंरोजगाराच्या माध्यमातून सुमारे ५० हजार लोकांना प्रशिक्षण दिलेले आहे. त्यामुळे ते नक्कीच स्वतःच्या पायावर उभे राहतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकार गावागावात पोहचू शकत नाही म्हणून या संस्थेच्या माध्यमातून गावागावात जाऊन लोकांना सक्षम बनविण्याचे काम सुरू आहे. सबलीकरण व सशक्तीकरणात महिलाही आघाडीवर आहेत, असे उमा प्रभू म्हणाल्या. नाबार्डचे महाव्यवस्थापक एल. के. पिंगळे म्हणाले, ग्रामीण कृषी विकास व ग्रामीण भागात समृद्धी आणण्याचे काम नाबार्ड करत आहे. भविष्यात कृषी उत्पादनाची दुर्मीळता लक्षात घेता ग्रामीण भागातील लोकांना रिसोर्स केंद्र व अनुभव निर्माण व्हावा म्हणून मास्टर फॉर्मर योजना राबवून प्रत्येक गावात अनुभवी व्यक्ती निर्माण करण्याचे प्रशिक्षण दिले गेल्यास सक्षमता वाढेल. ■

सोमवार दि. २ मे २०११ तरुण भारत




**सावंतवाडी :** क्षमतावृद्धी कार्यशाळेत बोलताना सौ. उमा प्रभू. बाजुला आर. व्ही. कदम, एल. के. पिंगळे व आर. सी. पाठक

# स्वयंसेवी संस्थांनी नियोजन करावे

## उमा प्रभू यांचा सल्ला

▶ आरोस / प्रतिनिधी

स्वयंसेवी संस्थांनी स्वतःला सक्षम करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे. त्यासाठी अशा जनशिक्षण संस्थेच्या कार्यात सहभागी होऊन विकास साधावा, असे आवाहन जनशिक्षण संस्थेच्या अध्यक्षा उमा सुरेश प्रभू यांनी मळगाव येथे केले. सावंतवाडी रेल्वे स्टेशनसमोरील हॉटेल कोकण क्राऊनच्या सभागृहात स्वयंसेवी संस्थांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन उमा प्रभू यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रीय साक्षरता अभियानाचे सल्लागार आर. पी. पाठक, जनशिक्षण संस्थेचे संचालक आर. व्ही. कदम, नाबार्डचे श्री. पिंगळे आदींसह जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बजाज पुरस्काराच्या मानकरी श्रीमती शैला अमृते यांनी महिलांनी निर्भिडपणे पुढे येऊन स्वतःला सिद्ध करून दाखविले पाहिजे. ग्रामीण भागात स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी विविध व्यवसायांना संधी आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या काथ्या मालावर आधारित उद्योगव्यवसाय सुरू केल्यास रोजगारासाठी शहराची वाट धरण्याची गरज नाही, असे सांगितले.

कोकणात उपलब्ध होणारी फळे, आंबे, फणस, काजू, जांभूळ, करवंदे आदींवर प्रक्रिया करून विविध पेय, खाद्यपदार्थ बनविणे शक्य आहे. तसेच नाचणी, तांदूळ यापासून गोड पदार्थ, घावणे, उकडीचे मोदक, शेवया आदी पदार्थांना देशात तसेच विदेशातही मागणी आहे. त्यामुळे येथील तरुणांनी मुंबईचा रस्ता न धरता आपल्या गावात राहून उद्योग करावेत, असे आवाहनही सौ. अमृते यांनी केले.

सौ. परिजिता कानिटकर यांनी निधी संकलन या विषयावर विशेष मार्गदर्शन केले. स्वयंसेवी संस्थांना निधी संकलन प्रक्रियेत मोठ्या अडचणी येतात. त्यावर मात करण्यासाठी अभ्यासपूर्ण नियोजन करणे आवश्यक आहे. यासाठी समन्वय, संयम, सहनशीलता, कार्य करण्याची प्रवृत्ती जोपासली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नकारात्मकतेमधून सकारात्मकतेकडे जाण्याची मानसिकता ठेवल्यास संस्थेसाठी देणगी मिळविणे सहजशक्य आहे. त्यासाठी आपली कार्यक्षमता सिद्ध करावी लागणार आहे. यासाठी स्वतःला सक्षम बनवा, असे आवाहन सौ. कानिटकर यांनी केले.

नाबार्डचे श्री. पिंपळे यांनी विविध योजनांची माहिती दिली. त्यासाठी मार्गदर्शन करण्याचे आश्वासनही दिले. सूत्रसंचालन राजश्री सामंत यांनी केले.

रत्नागिरी टाइम्स

दि. २८/४/२०११




जनशिक्षण संस्था सिंधुदुर्गच्यावतीने बांधणी क्षमता कार्यशाळेत बोलताना अध्यक्षासौ. उमा सुरेश प्रभू, व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक आर. व्ही. कदम. नाबार्डचे महाव्यवस्थापक श्री. पिंगळे व एन. आर. एच. एम. चे श्री. फाटक. (छाया - अभिमन्यू लोंढे)

रत्नागिरी टाइम्स

दि. ०१/०५/२०११

# क्षमता वृद्धी कार्यशाळा संपन्न

कुडाळ, ३० एप्रिल (वार्ताहर)- येथील हॉटेल कोकण करून येथे जनशिक्षण संस्थान सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंसेवी संस्थाच्या एकदिवसीय क्षमता वृद्धी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सौ. उमा प्रभू यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी व्यासपिठावर राष्ट्रीय साक्षरता अभियानाचे सल्लागार आर.पी. पाठक तसेच नाबार्डचे जनरल मॅनेजर एल.के. पिंगळे जनशिक्षणाचे संचालक आर.व्ही.कदम उपस्थित होते.

स्वयंसेवी संस्थांची क्षमता बांधणी करण्याच्या व्यापक उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून अशा कार्यक्रमातून संस्थांनी प्रेरणा घेऊन क्रांतीची बीजे रोवली पाहिजेत. संस्था या तळागावात काम करत असताना असंख्य अडचणी येत असतात. अशावेळी परस्पर सहकार्याच्या भावनेतून काम केल्यास त्याची प्रगती निश्चित होईल असा आशावाद सौ. प्रभू यांनी व्यक्त केला. पिंगळे, श्री. पाठक, श्री. कदम यांनी देखील आपले विचार मांडले. तसेच उपस्थित व्याख्यांन सौ. शैला अमृते, सौ. परिनित्र कानटेकर, रघुवीर देसाई, आनंद देसाई, सौ. कांचन परूळेकर, डॉ. अभय कुद्रळे, डॉ.पुरूषोत्तम आगाशे यांची अनुक्रमे, संपर्क यंत्रणा साधनांची उपलब्धता, उत्पादीत वस्तूची गुणवत्ता वदनी वेष्टन व विपनन कौशल्य, स्वयंसिद्ध संस्थेची यशोगाथा संवादकौशल्य ठेवणे आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी जनशिक्षण संस्थानच्या प्रशिक्षणार्थींनी तयार केलेल्या विविध खाद्य पदार्थ, शोभीवंत वस्तू हस्तकलेच्या वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील व अनेक स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. शेवटी लुपिनचे व्यवस्थापक योगेश प्रभु यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विकसित राष्ट्राच्या निर्मितीसाठी एनजीओंच्या सहकार्याची गरज

## क्षमता वृद्धी कार्यशाळेत प्रा. पाठक यांचे प्रतिपादन

**मळगाव (प्रतिनिधी) :** आपल्या राष्ट्राने आज फार मोठी प्रगती साधली आहे. या विकासप्रक्रियेत उद्योजकांपासून सामान्य शेतकरी व मजूर यांचेही योगदान फार महत्त्वाचे आहे. मात्र, तरीही भारत देश आजही विकसनशील राष्ट्र म्हणून गणले जाते. यासाठी देशातील प्रत्येक माणूस सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनला तरच आपलं राष्ट्र 'विकसित राष्ट्र' होऊ शकेल. मात्र, यासाठी शासनाबरोबरच तळागाळात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन एन. एस. एम. ए.चे कन्सल्टंट प्रा. पाठक यांनी केले. नाबार्ड, जनशिक्षण संस्थानसारख्या संस्था यासाठी मोलाचे कार्य करीत असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले.

मळगाव येथील हॉटेल कोकण क्राऊन येथे जनशिक्षण संस्थान आणि लुपिन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संस्था क्षमता वृद्धी कार्यशाळेच्या उद्घाटनपर भाषणात ते बोलत होते. तत्पूर्वी पाठक यांच्या

सचिन रेडकर




क्षमता वृद्धी कार्यशाळेत बोलताना सौ. उमा प्रभू बाजूला नाबार्डचे महाप्रबंधक एल. के. पिंगळे, संचालक एस. एस. कदम व पाठक

हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी नाबार्डचे महाप्रबंधक एल. के. पिंगळे, जनशिक्षण संस्थानच्या अध्यक्षा सौ. उमा प्रभू, संचालक एस. एस. कदम आदी उपस्थित होते.

समाजासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्यांच्या पाठीशी देवाचे आशीर्वाद व जनतेच्या शुभेच्छा नेहमीच असतात. त्यामुळे तळागाळातील सर्वसामान्य माणसांच्या उन्नतीसाठी एन. जी. ओ. नी कार्य करण्याची गरज त्यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केली. शासनाच्या सुविधांचा लाभ घेऊन सर्वसामान्यांचा जीवनस्तर उंचावण्याची गरज बोलून दाखवताना साक्षरतेचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. नाबार्डचे महाप्रबंधक एस. के. पिंगळे यांनी शेती व बागायतीतील उत्पन्न घटल्यानेच उत्पन्न कमी व गरज जास्त यामुळे आज भाववाढ झाली असल्याचे सांगत विकास साधायचा असेल तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी नाबार्डच्या माध्यमातून 'मास्टर फार्मर्स' योजना राबविली जात असून यासाठी गावागावातील अनुभवी व्यक्तींकडून ग्रामीण भागात उत्पन्न वाढीसाठी कार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले. ग्रामीण माणूस हा सर्वात जास्त प्रामाणिक असतो. मात्र, चांगल्या संधीच त्याच्यापर्यंत पोहोचत नसल्यानेच बँकांना वाईट अनुभव येत असतात अशी मल्लिनाथीही त्यांनी व्यक्त केली.

जनशिक्षणच्या अध्यक्षा उमा प्रभू यांनी प्रास्ताविक करताना संस्थानचे १० वर्षातील कार्य विशद केले. संचालक कदम यांनीही जनशिक्षण संस्थानच्या माध्यमातून गावागावात राबवित असलेले उपक्रम, शैक्षणिक व व्यावसायिक कार्य व उपलब्ध रोजगार यांची माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात दापोलीतील औद्योगिक संस्थेच्या संचालिका शैला कानिटकर यांनी महिलांना उद्योगातील नवनवीन संधी यांचे अनुभवासहित विवेचन केले. कोकणातील उपलब्ध धान्यापासून पिठाच्या विविध पदार्थाबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. तर यानंतर 'सोसवा' संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी परिणीता कानिटकर यांनी 'निधी संकलन व वित्त व्यवस्थापन' या विषयावर सखोल अभ्यासपूर्ण माहिती दिली. 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे व देणाऱ्यालाही सहभागी करावे' या शब्दांत त्यांनी दातृत्व व गरज यातून निधी संकलनाची माहिती दिली.

तिसऱ्या व शेवटच्या सत्रात चर्चासत्रातून प्रशिक्षणार्थींनी विचारलेल्या समस्या व प्रश्न तज्ज्ञांनी जाणून घेत मार्गदर्शन केले. स्वागत संचालक कदम, तर सूत्रसंचालन व आभार राजश्री सामंत यांनी मानले. या कार्यशाळेला विविध सामाजिक व सेवाभावी संस्थानचे प्रतिनिधी, अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.